# लंडन - बकिंगहम पॅलेस



लंडनमधली एक सुंदर सकाळ. स्थळ, बकिंगहम पॅलेस. मायकेल फॅगन नावाचा एक मनोरुग्ण तरुण, ह्या पॅलेसची ती उंच भिंत ओलांडून, पुढच्या ड्रेन पाईपवर चढून, सरळ, पॅलेस मधल्या राणी एलिझाबेथच्या बेडरूममध्ये शिरला होता. पडद्याच्या आवाजाने राणीला जाग आली. समोर एक सर्वस्वी अनोळखी तरुण पाहून तिला धक्काच बसला.तिला काही कळेचना.स्वतःला सावरत तो तरूण कोण, कुठला याची तिने विचारपूस केली. मेडला सांगून त्याच्यासाठी सिगरेट्स मागवण्यात आल्या आणि त्याला गप्पांमध्ये गुंतवून ठेवून पॅलेस वरच्या पोलिसांना कळवलं गेलं. अगदी काही क्षणातच पोलीस आले..त्यांनी  मायकेलला ताब्यात घेतलं आणि पुढचा अनर्थ टळला. एखाद्या सस्पेन्स स्टोरी मध्ये शोभेल अशी...इंग्लंडच्या राणीच्या थेट बेडरूममध्ये शिरणाऱ्या या तरुणाची ही  सत्यघटना

# लंडन - बकिंगहम पॅलेस

घडली 1982 साली..आणि ती घडली बकिंगहम पॅलेस या रॉयल रेसिडेंस मध्ये.

बकिंगहम पॅलेस हा इंग्लंडच्या राणीचा राजवाडा.पॅलेस म्हटल्यावर आपल्या डोळ्यासमोर एक चित्र ऊभं राहतं. पण बकिंगहम पॅलेस त्याच्या अगदी उलट आहे. कारण हे राणीचं निवासस्थान असलं तरी अनेक वर्षांपूर्वी हा राजवाडा म्हणून बांधला गेला नव्हता.अनेक वर्ष पडीक असलेल्या या जागेत रेशीम पिकवण्याचं काम सुरू होतं.त्यावर देखरेख करण्याकरता ठेवण्यात आलेल्या बकिंगहमच्या डयूकने तिथेच स्वतःसाठी एक साधंसं घर बांधलं होतं. त्याला बकिंगहम हाऊस असं म्हणत .पुढे चौथ्या जॉर्जच्या काळात राजवाड्यासाठी या जागेची निवड झाली. त्यावेळी जुनं बकिंगहम हाऊस न पाडता ते तसंच वाढवत नेऊन त्याचा राजवाडा करण्यात आला.पुढच्या राजांनी आपापल्या सोयीप्रमाणे त्यात बदल केले. त्यामुळे बकिंगहम पॅलेस हा इतर पॅलेसेससारखा दिसत नाही.पॅलेसमध्ये प्रथम राहायला येणारी राणी म्हणजे क्वीन व्हीक्टोरिया. तेव्हापासून सगळे राजा राणी या इथेच राहतात .पॅलेसची रॉयल गॅलरी अतिशय महत्त्वाची आहे. कोणत्याही विशेष प्रसंगी राजघराण्यातल्या सर्व प्रमुख व्यक्ती या गॅलरीत एकत्र येतात.

राणी इथे मुक्कामाला असली की पॅलेसवरती रॉयल स्टँडर्ड फ्लॅग चढवलेला असतो आणि जर पॅलेस वरती युनियन जॅक चढवलेला असला, की समजायचं आज राणीचा मुक्काम पॅलेसवर नाही.एरवी रुक्ष आणि आणि शांत वाटणारा हा पॅलेस काही सोहळे,समारंभ तसंच चेंजिंग ऑफ द गार्ड सेरीमनीच्या वेळेत गर्दीने फुलून जातो. पॅलेसची गेट्स आकर्षक आहेत. काळ्या गजांना वर फुटभर सोनेरी मुलामा दिल्याने त्याला एक झळाळी येते.त्यावर असणारे व्हीक्टोरिअन लॅम्प्सही सुरेख आहेत.

साधारणपणे ३९ एकरांवर वसलेल्या बकिंगहम पॅलेसमध्ये ७७५ रुम्स आहेत.त्यापैकी १९ स्टेट रुम्स, वर्षातल्या ठराविक दिवसांसाठी, सर्वांना पाहण्याकरिता खुल्या असतात. अर्थात रॉयल फॅमिली जेव्हा पॅलेसमधे नसते तेव्हाच. बकिंगहम पॅलेसने राणी आणि तिच्या कुटुंबियांचं आयुष्य जवळून पाहिलं. दोन महायुद्ध पाहिली.पहिल्या महायुद्धात पाचव्या जॉर्ज राजाने रॉयल गॅलरीत येऊन प्रजेला धीर दिला होता. तर दुसऱ्या महायुद्धात जर्मन बॉम्बहल्ल्यांना सतत पॅलेसला तोंड द्यावे लागले.पण त्याही परिस्थितीत सहावा जॉर्ज राजा आणि त्याची मुलगी म्हणजे-- आजची

# लंडन - बकिंगहम पॅलेस

राणी दुसरी एलिझाबेथ हे पॅलेस सोडून गेले नाहीत.ते तिथेच राहिले. इंग्लिश माणसाचे मनोबल अशाच गोष्टींनी टिकून राहिलं. त्यामुळे पार्लमेंटमधून सतत लोकशाहीचा घोष करणाऱ्या इंग्लिश माणसाला, राजेशाही महत्त्वाची का वाटते..याचं उत्तर राजे आणि राण्या यांच्याकडून  त्यांना मिळणारं मानसिक बळ ह्यात आहे .म्हणून पार्लमेंटइतकंच बकिंगहम पॅलेस हे इंग्लिश माणसाचं एक अढळ श्रद्धास्थान आहे.